रयत शिक्षण संस्थेचे,
**आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)**
**ता. पलूस, जि. सांगली**

दिनांक : 9 ऑक्टोबर 2019

# मराठी विभाग

## लोककला संकलन

महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने परिसरातील लोककलांचे संकलन करण्याचे काम सुरू आहे. या कामांतर्गत परिसरातील लोकसाहित्याचे संकलन करण्यात येते. यामध्ये जात्यावरील ओव्या, धनगरी ओव्या, जागर, डहाक, वासुदेवाची गाणी, पोतराजाची गाणी, दिवट्याची गाणी, गौरीची गाणी यासारख्या लोककला प्रकारांचे संकलन करण्यात येत आहे. सदर संकलनातून परिसरातील संस्कृती व सामाजिक पर्यावरण अभ्यासता येणार आहे. भविष्यात नामशेष होणाऱ्या ह्या लोककलांमध्ये महत्वाचे लोकसंचित सामावलेले आहे. तेव्हा हे ज्ञान भांडार डिजिटल स्वरूपात संकलन केल्यास भविष्यात याचा नक्कीच उपयोग होणार आहे.

दिनांक 8 ऑक्टोबर 2019 रोजी दसऱ्याच्या सणानिमित्त मौजे आष्टा (ता.वाळवा) येथील बिरोबा मंदिरामध्ये धनगरी ओव्याचे (सुंबरान) छायाचित्रण करण्यात आले. यावेळी विभागातील बी.ए. भाग तीनचे विद्यार्थी प्रतिक आरबुने व सौरभ जाधव यांच्यासह प्रा. तेजस चव्हाण उपस्थित होते. या कामासाठी मराठी विभागप्रमुख प्रा. दिलीप कोने यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्या प्रोत्साहानातून सदर लोककलेचे संकलन करण्यात आले.

**निष्पत्ती (Outcome)**

- ❑ लोककलांबाबत माहिती कळाली.
- ❑ विद्यार्थ्यांना माहितीचे संकलन कसे करावे हे समजले.
- ❑ परिसरातील महात्त्वाचा कलाप्रकार डिजीटल स्वरूपात विभागात संवर्धीत झाला.

लाभार्थी संख्या : मराठी विभागातील विद्यार्थी






प्रमुख
मराठी विभाग

आर्टस, सायन्स ॲंड कॉमर्स कॉलेज
मराठी विभाग
रामानंदनगर

प्राचार्य,
आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)